**MHAH230007472019**

## विशेष दिवाणी दावा क्र.४०/२०१९ मधील नि.३७ वरील आदेश

## (पांडुरंग शिवराम काळाणे वि. लक्ष्मण अंकुश लबडे)

१. अर्ज व म्हणणे पाहिले. वादीचे सुविदय वकीलांचा युक्तीवाद ऐकला.

२. मयत वादीचे वारसांनी अर्जात कथन केले आहे की, प्रस्तुतचा दावा वादी यांनी प्रतिवादी यांचेविरुध्द खरेदीखत बेकायदेशीर ठरवून मिळणेकामी व निरंतरचे ताकीद मनाई आदेशासाठी दाखल केलेला आहे. दावा प्रलंबित असतांना वादी पांडुरंग शिवराम काळाणे हे दि.२०.०१.२०२५ रोजी मयत झालेले आहेत. मयत वादी यांना पत्नी, दोन मुले व एक मुलगी असे कायदेशीर वारस आहेत. मयत वादीचे वारसांना कायदयाचे अनभिज्ञतेमुळे मयत वादीचे कायदेशीर वारस रेकॉर्डवर घेण्यास उशीर झालेला आहे. तरी सदर उशीर माफ करुन मिळावा अशी विनंती मयत वादीचे वारसांनी केली.

३. प्रतिवादी यांनी त्याच अर्जावर आपले म्हणणे दाखल करुन अर्जास विरोध दर्शवला. त्यांचे म्हणण्यानुसार अर्ज खरा व कायदेशीर नाही. सबब अर्ज नामंजूर करण्यात यावा अशी विनंती प्रतिवादी यांनी केली.

४. अभिलेख पडताळला. वादीने नि.क्र.३४ अन्वये दाखल केलेले वादी पांडुरंग शिवराम काळाणे यांचे मृत्यु प्रमाणपत्राचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, त्यांचा मृत्यू दि.२०/०१/२०२५ रोजी सुर्या सह्याद्री हॉस्पीटल पुणे येथे झालेला असून सदर प्रमाणपत्र दि.२८/०१/२०२५ रोजी देण्यात आले आहे. प्रस्तुत अर्ज दि.१६/०७/२०२५ रोजी दाखल करण्यात आला आहे. प्रस्तुतचा दावा हा वादीने खरेदीखत बेकायदेशीर ठरवुन मिळणेसाठी व निरंतर ताकीद मिळणेसाठी दाखल केलेला आहे. त्यामुळे मयत वादी पांडुरंग शिवराम काळाणे यांचे प्रस्तवित वारस रेकॉर्डवर आणणे न्यायोचित ठरणार आहे. करीता, पुढीलप्रमाणे आदेश पारित करण्यात येत आहे.

**आ दे श**

अर्ज नि. ३७ मंजूर.

SHIVAJI PANDHRINATH KEKAN
Digitally signed by SHIVAJI PANDHRINATH KEKAN
Date: 2025.10.28 17:19:28 +0530

श्रीगोंदा.
दिनांक - २८/१०/२०२५.

दिवाणी न्यायाधीश, व. स्तर,
श्रीगोंदा, जि. अहमदनगर.